# सार्वजनिक वाहन चालविण्याचे प्राधिकारपत्र (PSVA BADGE) मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व कार्यपद्धती

१) अर्जदारास ज्या वर्गाचे प्राधिकारपत्र (PSVA BADGE) पाहिजे त्या वर्गाची अनुज्ञप्ती

- रिक्षासाठी :- ३ चाकी वाहनाची परिवहन संवर्गातील अनुज्ञप्ती
- काळी पिवळी टॅक्सी / टुरिस्ट टॅक्सी :- हलके मोटार वाहन परिवहन संवर्गातील अनुज्ञप्ती
- प्रवासी बस :- जड वाहन (परिवहन संवर्ग १ वर्षे कालावधी पूर्ण असलेले)

२) तहसिलदाराने जारी केलेले एसईसी (ऑनलाईन स्वरुपातील) प्रमाणपत्र

३) चारित्र्य पडताळणी अहवाल (पोलीस दाखला)

४) वैद्यकीय प्रमाणपत्र (नमुना १-A)

उपरोक्त कागदपत्रासहीत अर्जदाराने sarathi.parivahan.gov.in या संकेतस्थळावर खालीलप्रमाणे अर्ज करावा.

Login या टॅबवर Click करुन Sarathi login वर Click करावे - यानंतर Maharashtra State सिलेक्ट करावे.

⬇

Services on Driving License - Read and then press continue and fill the required information.

⬇

Select the service of issue of PSVA BADGE

⬇

Print prefilled form and acknowledgement

⬇

Upload document – SEC, Police Verification report, Driving License

⬇

Pay fee

⬇

Get Print Out

याबाबतची विहीत फी रु.७६६/- व अतिरिक्त वर्गासाठी रु.३००/- अधिक भरावी. अर्जदाराने अर्जाची प्रिंट आऊट, १-अ नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र, Annexure-B नमुन्यातील स्वयंघोषणापत्र व मुळ कागदपत्रांसह परिवहन कार्यालयात बॅज विभागात संपर्क साधावा. संबंधीत कर्मचारी एस.ई.सी. प्रमाणपत्र व पोलीस चारित्र्य पडताळणी दाखला याची ऑनलाईन पडताळणी करुन प्रमाणित करतील. तद्नंतर उमेदवाराने बॅज डयुटीवरील मोटार वाहन निरीक्षकासमक्ष चाचणीसाठी उपस्थित रहावे. मोटार वाहन निरीक्षक उमेदवाराची स्थानिक भाषा, भौगोलीक ज्ञान व महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम २१ व २२ प्रमाणे ऑटो-रिक्षा / टॅक्सीसाठी व नियम २० प्रमाणे प्रवासी बससाठी नमूद कर्तव्याबाबतच्या माहितीची तपासणी करतील. तसेच वैद्यकीय दाखल्याच्या आधारे उमेदवार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबत खात्री करतील. उमेदवार बॅज देण्यासाठी पात्र असल्याबाबत मोटार वाहन निरीक्षकाने शेरा दिल्यानंतर सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यामार्फत बॅज देण्याबाबत अंतिम आदेश जारी करण्यात येतील. याबाबत संगणकावर नोंद घेतल्यानंतर उमेदवारास एस.एम.एस संदेश प्राप्त होईल. बॅजची नोंद असलेले ड्रायव्हींग लायसन्स उमेदवारास रजिष्टर्ड पोस्टाने प्राप्त होईल. त्यानंतर उमेदवाराने पिवळया रंगातील ओळखपत्रासाठी बॅज विभागात संपर्क साधावा.